**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र. : मुमाआ-२०१९/नों. क्र. १०९८/त. क्र. २३४/२०/०१**

**श्री. इक्बाल आर. खान**
एक्ता नगर, ए/१५, रुम नं.१०,
यशवंतराव चव्हाण नगर,घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड,
मंडाळा मानखुर्द (प.) मुंबई – ४०० ०४३.

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का)**
एच/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय, प्लॉट क्र. १३७, टीपीएस ५,
दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू.), मुंबई ४०० ०५५.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता एच/पूर्व विभाग**
एच/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय, प्लॉट क्र. १३७, टीपीएस ५,
दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू.), मुंबई ४०० ०५५.

| | | |
|---|---|---|
| **तक्रारीचा दिनांक** | : | १६.१०.२०१९ |
| **सुनावणीचा दिनांक** | : | **२०.११.२०२०** |
| तक्रारदार | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रारदार यांनी दि. २५.०७.२०१७ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाबाबत अपील क्र.मुमाआ-२०१८/नों.क्र. ४६८१/अपील क्र. १९४७/२०१८/०१ नुसार दि. ०१.०१.२०१६ ते माहिती अर्जातील ०२.०२.२०१७ या रोजीपर्यंत एच/पूर्व विभागातील प्रभाग क्र. ८२ मधील तोडण्यात आलेली अनधिकृत बांधकामाची व या ठिकाणी कोणकोणते क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्यात आली व त्या अनधिकृत बांधकामावर किती लोकांकडून तक्रार करण्यात आलेली आहे याबाबतची माहिती मागितली असून राज्य माहिती आयोगाने दि. ११.०९.२०१८ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत अपिलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती जलद गतीच्या टपालाने नि:शुल्क पाठविण्यात यावीत. तथापि अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी

दि. २६.१०.२०१९ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ०२.०२.२०१७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अद्याप तक्रारदार यांना मिळालेली नसल्याचे सांगितले.

दृकश्राव्य माध्यमाद्वारे आजच्या सुनावणीस तक्रारदार यांनी असे विशद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे.

आजच्या सुनावणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तरी तक्रारीची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित राहावे. सदर **तक्रारीची पुनर्सुनावणी दिनांक ११.१२.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोजित करण्यात येत आहे. तरी तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांनी स्वत: ऑनलाईन उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

State Information Commission ★ Maharashtra ★

**मुंबई**
**दिनांक : २०.११.२०२०**

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

AARTI